

Dissemination of Education for Knowledge, Science and Culture.

-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**Vivekanand College, Kolhapur**

**(Empowered Autonomous)**

# Department of History

## Open Book Test

## NOTICE

Date: 10/01/2025

The students of B.A. Part-I in the History Department of Vivekananda College are informed that Open book test on Chapter 2 (Social life in Maurya Empire) of the subject " History of Ancient India" will be conducted on Monday, 13th January, 2025. The test will take place from 10:00 AM to 11:00 AM in Room Number 214. All students are requested to be present on time with their preparation and necessary reference materials for the test.

Dr. S. R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)**

B.A – I Semester – II


CONTINUOUS INTERNAL EXAMINATION

Subject – History

Title- History of Ancient India     Paper No – II

Subject Code- (2DSC01HIS22)

| | |
|---|---|
| **Date:** | Day: |
| Time: | Total Marks: 10 |
| **Type of Test:** | Unit Test |
| **Additional Info:** | |
| Module | 2 |
| **Que. Explain in detail the social life during Mauryan Period.** | |



Dissemination of Education for Knowledge, Science and Culture.

-Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Vivekanand College, Kolhapur

## (Empowered Autonomous)

## Department of History

## History of Ancient India:

## Open Book-Report

Date: 15/01/2025

The students of B.A. Part-1 in the History Department of Vivekananda College had Open book test on the paper History of Ancient India on Monday, 13th January, 2025. There were 9 students present at this time. The Open book test helped the students reduce their fear of exams.

It was seen that the students used many reference tools and the internet to obtain information for this test. It also helped increase the students' knowledge of the subject and boost their confidence.

Dr. S. R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
POWERED AUTONOMOUS)

Name - Radhika shashikant Jadhav.


।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

52015

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)


**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :

Subject : History (Major)

Roll No. : 4082

Test / Tutorial No. :

Class : BA - FY

Div. :

10/10

प्रश्न- मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

→ मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पाहण्यापुर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे -

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणुन मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच या साम्राज्याच्या कालखंडाला इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली. ज्याने चाणक्यांच्या मार्गदर्शनाखाली नंद राजवंशाचा पाडाव केला. साम्राज्याचे शिखर चंद्रगुप्ताचा नातु अशोक द ग्रेट याच्या अधिपत्याखाली आले. कलिंग युद्धा-नंतर बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकीर्दीत नैतिक तत्त्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांचा प्रसार झाला. संपुर्ण साम्राज्यात वितरित केलेले त्याचे खडक आणि स्तंभ शिष्य, त्याच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणुन काम करतात. मौर्यांची राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले. सम्राट अशोकाच्या मृत्युनंतर, मौर्य

साम्राज्याचा हळुहळू ऱ्हास होत गेला.
मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरुन मिळते. मॅगॅस्थिनिसने लिहिलेल्या 'इंडिका' या ग्रंथांत तसेच कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन करण्यात आले.

• मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल →

1) वर्णव्यवस्था → मौर्यकालिन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता. समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण अस्तित्वात होते या काळात जातीव्यवस्था जटिल स्वरुपाची होती. प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाया व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. मॅगॅस्थिनिसने लिहिलेला 'इंडिका' या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जाती आढळतात

2) आश्रमव्यवस्था → मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये विभागले होते. ब्रह्मचार्याश्रमामध्ये वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहुन धर्माचे अध्ययन करीत असे. पुढील २५ वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेवुन गृहस्थाश्रमातुन वानप्रस्थाश्रमात प्रवेश करीत असे. शेवटी संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करीत असे. संन्यास आश्रमामध्ये मोक्षप्राप्ती मिळवण्यासाठी त्याचा प्रयत्न असे.

3) संयुक्त कुटुंबपद्धती → संयुक्त कुटुंब पद्धत तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धत होती. एका कुटुंबात साधारणतः

तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख असे. आंतरजातीय विवाह व बहुपत्नी विवाहाच्या पद्धतीमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीस धोका निर्माण झाला.

4) विवाह पद्धती → मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जात होते. मुलीचे वय 12 वर्ष तर मुलाचे वय 16 वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. विवाह शक्यतो जातीत होत. पण तरीही आंतरजातीय विवाह झाल्याचे आपणास दिसुन येते. अनेक पुत्रांना जन्म देणे हा विवाहाचा प्रमुख उद्देश होता.

5) अन्न → लोक शाकाहारी व मांसाहारी होते. दुधापासुन तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहु, अन्न म्हणुन वापरत असत. मौर्यकालिन लोक पशु-पक्षांचे मांस खात होते. अशोकाने काही काळाने पशु हत्येवर बंदी घातली होती.

6) पोषाख → मौर्यकालातील लोक सुती वस्त्रे वापरत. पुरुष गुडघ्यापर्यंत अंतर्वस्त्र, खांद्यावरुन चादरी सारखे पांघरलेले वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकाली लोक कर्णफुले, हार, बाजुबंद व दस्तबंद हे विविध धातुंचे दागिने व अलंकार वापरत असत.

7) मनोरंजन → मॅगॅस्थिनिसच्या मते, "रथदौड, घोडदौड आणि सांडाचे युद्ध या द्वारे मनोरंजन होत असे." अर्थशास्त्रानुसार गायक, वादक, नरनर्तक, वाञ्जिज यांच्या कला प्रदर्शनामुळेही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सामुहिक उत्सवाचे आयोजन केले जात असे.

४) स्त्रियांची स्थिती → मौर्यकाळामध्ये समाजातील स्त्रियांना सन्मानाची वागणुक मिळत असे आणि कुटुंबामध्येही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते. कौटिल्याच्या मते "संकट प्रसंग सोडता स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला 6 पण दंड केला पाहिजे आणि पतीच्या आज्ञेशिवाय बाहेर गेली तर 12 पण दंड केला पाहिजे" यावरुन असा निष्कर्ष निघतो की मौर्यकाळात जरी स्त्रियांना सन्मानाची वागणुक दिले जात असली तरी स्वातंत्र्य नव्हते. तिच्यावर पतीची बंधने होती.

10

Karuna Chandrakant Koli.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's 52535

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :

Roll No. : 4148

Class : B.A. FY

Subject: History Major

Test / Tutorial No. : 10/10

Div. :

* मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

• ऐतिहासिक प्रस्तावना :-

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. अश्मयुगापासून मनुष्य गटागटाने राहत असे नंतर त्यांचा समाज बनला. समाज म्हणजे समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधाची व्यवस्था होय. प्राचीन भारतीय समाजरचनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे जाती व्यवस्था होय. जिने भारताच्या इतर सर्वच बाबींना प्रभावित केले होते. प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेची पुढील काही प्रमुख वैशिष्ट्ये आपणास सांगता येतील.

1] वर्णव्यवस्था :-

जीवाचे परमात्म्याशी संमिलन घडवून आणणे म्हणजे मोक्ष संपादन करणे होय. जे जीवाचे अंतिम ध्येय मानले गेले. पण हे ध्येय संपादन करणे हे कार्यही तितकेच कठीण आहे. वर्णाश्रमामध्ये यज्ञ, तप, संस्कार इ. योजना करण्यात आली. वर्णव्यवस्था ही गुणकर्मावर आधारलेली समाजव्यवस्था त्या व्यवस्थेनुसार समाजाची ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र अशा चार वर्णात विभागणी झाली. प्रत्येकाने आपापल्या वर्णानुसार कर्मे करावी. ही कर्मे कर्तव्यबुद्धीनी व शुध्द मनाने करावी व ह्या समाज

नियोजित कर्माद्वारे आपला विकास (पिंडशुध्दी) करीत करीत धर्माने निर्दिष्ट केलेल्या ध्येयाच्या वाटेने प्रवास करावा अशी ही योजना आहे.

② जातीव्यवस्था :-

जातीव्यवस्था ही प्राचीन भारतीय समाजाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. एका विव्दान पुरुषाच्या मुखातून ब्राम्हणांची निर्मिती, बाहुतून क्षत्रियांची निर्मिती मांड्यातून, वैश्यांची निर्मिती तळपायातून व शुद्रांची निर्मिती झाल्याचे ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात म्हटले आहे.

यानुसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र या चार जाती व त्यांच्या अनेक उपजाती या काळात समाजात प्रचिलित होत्या. त्यांच्यामध्ये परस्पर रोटीबेटींचा व्यवहार होत नव्हता. जातीव्यवस्थेच्या ताठरतेमुळे सामाजिक विषमता निर्माण झाली होती. ब्राम्हणांना सर्वोच्च जात मानले जात असे आणि त्यांना समाजात सर्वाधिक शक्ती आणि विशेषाधिकार प्राप्त होते. धार्मिक विधी करणे, धार्मिक ग्रंथ शिकवणे आणि राजे आणि राजकर्त्यांना सल्ला देणे ही त्यांची जबाबदारी होती.

③ आश्रम व्यवस्था :-

आश्रमव्यवस्था ही वर्णव्यवस्थेशी संलग्न आहे. वर्णव्यवस्था ही समाजातील संघर्ष व स्पर्धा टाळण्यासाठी केलेली समाजव्यवस्था आहे. तशीच आश्रमव्यवस्था ही व्यक्ती व समाज या दोहोंच्या विकासासाठी असून ह्या व्यवस्थेमुळे वयोमानानुसार वाढत जाणाऱ्या पिपासेनुसार (काम पिपासा, सत्ता पिपासा, पित्त पिपासा) सुयोग्य नियंत्रण घालण्यात आले. ह्या आश्रमव्यवस्थेमुळे मानवी आयुष्याचे ब्रम्हचर्य, गृहस्थाश्रम वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार विभाग पाडण्यात आले असून प्रत्येकाने त्या त्या आश्रमात त्या वयाला अनुरुप अशी कर्तव्ये करावी असे बंधन घालण्यात आले. प्राचीन काळामध्ये असा समाज होता की मानवी आयुष्याचे व शंभर

मानून २५ वर्षांचे त्याचे चार भाग पाडले गेले होते. ज्यामध्ये सुरुवातीची पंचवीस वर्षे अध्ययन करून ब्रम्हचर्य धारण करणे अपेक्षित होते. नंतरची 25 वर्षे, विवाह करून पितृऋण फेडणे व गृहस्थाश्रमातील आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहण करणे अपेक्षित होते. पुढील 25 वर्षे संसारिक जबाबदाऱ्यातून हळूहळू विलीन होऊन वानप्रस्थाश्रम धारण करणे अपेक्षित मानले गेले. 75 वर्षांपासून आयुष्याची पुढील वर्षे संसाराचा त्याग करून वनामध्ये जाऊन ध्यान, मनन, चिंतन, जप, तप याद्वारे परमेश्वराचे स्मरण करून मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करणे अपेक्षित होते.

④ कुटुंबव्यवस्था :-

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये संयुक्त कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय कुटुंब व्यवस्था ही भारतीय समाजाच्या आणि भारतीय संस्कृतीचा कणा आहे. आपल्या पुढच्या पिढीला, सहज दैनंदिन व्यवहारातून सत्कृत्यांची सवय लावण्याचे कार्य, पिढ्यानुपिढ्या कुटुंबव्यवस्थेतून होत आहे.

प्राचीन काळात भारतीय कुटुंब व्यवस्था ही पितृसत्ताक पद्धतीची होती. ज्यामध्ये हिंदू वारसा कायद्यानुसार मोठ्या मुलाचा मोठा मुलगा हा त्या घराचा करता पुरुष मानला गेला होता. कुटुंबामध्ये नवरा बायको सह त्यांची मुले त्यांच्या बायका मुले गोविंदाने राहत असत. त्या कुटुंबावरील ऋण किंवा फायद्याच्या बाबी यासाठी कर्त्या पुरुषालाच जबाबदार धरले जात असत. असे कुटुंबातील इतर सर्व लोक घरच्या कर्त्या पुरुषाला त्याच्या विविध कामांमध्ये मदत करत असत.

⑤ विवाह पद्धती :-

प्राचीन भारताच्या वैविध्यपुर्ण सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात विवाह संस्थेची महत्त्वपुर्ण भुमिका होती. प्राचीन भारतीय विवाह पद्धतीमुळे तत्कालीन परंपरा, चालीरीती आणि धार्मिक श्रद्धांची माहिती आपणास प्राप्त होते. प्राचीन भारतीय समाजामध्ये अनेक प्रकारचे विवाह प्रचलित होते. ज्यामध्ये ब्रम्हविवाह,

देवविवाह, आर्षविवाह, प्रजापत्यविवाह, गंधर्वविवाह आणि आसुरी यांचा समावेश होता. सर्वात उदात्त मानल्या जाणाऱ्या ब्रम्हविवाह मध्ये वराने वधूच्या कुटुंबाला भेटवस्तु देणे समाविष्ट होते. ज्यामध्ये पत्नीचे भरणपोषण करण्याचे कर्तव्य पतीबाबत दर्शविते. देवविवाह प्रकाशात लग्नात, वधूला पुजारीला बलिदानाची भेट म्हणून अर्पण केले जात असे. आर्ष विवाहात वराने वधूच्या वडिलांना गाय आणि बैल भेट दिले जात असे, तर प्रजापत्य विवाह हा पुरुष आणि स्त्री यांच्यातील एक साधा आणि ऐच्छिक मिलन होता. दुसरीकडे, गंधर्व विवाह हा परस्पर संमतीवर आधारित प्रेमविवाह होतो. तर असुर विवाहात वराने वधूच्या कुटुंबाला वधूची किंमत देणे समाविष्ट होते. विवाह हे केवळ दोन व्यक्तींमधील मिलन नव्हते तर एक पवित्र बंधन होते.

⑥ अन्न व आहार :-

प्राचीन काळात समाजातील लोक हे शाकाहारी व काही प्रमाणात मांसाहारी असलेले दिसून येतात. शाकाहारमध्ये अन्नधान्य, कडधान्य, फळभाज्या, पालेभाज्या, व मसाल्याचे पदार्थ यांचे सेवन केले जात असे. तसेच आहारामध्ये दूध, अंडी, मासे, मांस यांचाही वापर केला जात असे. बहुतांशी कांदा, लसूण, मांस तसेच मदीराचे सेवन करणे वर्ज्य मानले होते.

⑦ अलंकार व आभुषणे :-

प्राचीन काळात समाजातील स्त्री-पुरुष या प्रत्येक घटकांना अलंकार व आभूषणाची आवड होती. तत्कालिन लिखित व अलिखित साधनांच्या माध्यमातून व उत्खननातून सापडलेल्या मुर्तींच्या माध्यमातून अलंकार व आभुषणाची माहिती मिळते. ज्यामध्ये सोने, चांदी, तांबे, पितळ याचबरोबर विविध मौल्यवान धातू, हिरे, मोती यांचा समावेश अलंकारामध्ये केल्याचे दिसून येते.

पुरुष हातांमध्ये कडे, गळ्यामध्ये ताईत व मोत्याच्या माळा

Karuna Chandrakant Koli

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's 52528

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :
Roll No. : 4148
Class : B.A. FY

Subject : History-Major
Test / Tutorial No. :
Div. :

घालत असत. तसेच स्त्रिया कर्णभुषणे, नथ, बिंदी, पायातील पैंजण, जोडवे, कमरपट्टा, बाजूबंद, बांगड्या व गळ्यामध्ये सोन्या चांदीच्या हारांचा वापर करत असत.

⑧ वेशभुषा व केशभुषा :-

प्राचीन काळात कापसापासून तयार झालेले व चरख्यावर विणलेले जाडे भरडे कापड वापरले जात असे. श्रीमंत व्यक्ती रेशीम कापडाचा वापर करत असत. कपड्यांच्या व्यापारामध्ये मोठी उलाढाल होत असे. पुरुष धोतर, पागोटे, शेला व पंजा यांचा वापर करत असत. तर स्त्रिया साडी-चोळी यासारखे वस्त्रे परिधान करत असत. रेशमि सुती मलमल या कापडांचा समावेश लोक करत असत.

⑨ स्त्री जीवन :-

प्राचीन काळात समाजात स्त्रीयांना दुय्यम स्थान दिल्याचे दिसून येते. धार्मिक कार्य, सण, यात्रा, उत्सव, समारंभ याप्रसंगी स्त्रीयांना महत्त्वाचे स्थान दिले गेले होते. परंतु मातृदेवता म्हणून गौरवलेले दिसून येते. वेद काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा, या स्त्री विदुषींनी अध्ययन करून वेद लेखनाचे काम ही केले होते. परंतु उत्तर वेद काळापासून स्त्रियांच्या

शिक्षणाचा अधिकार नाकारला जाऊन तिच्यावर बंधने लादली गेल्याचे दिसून येते.

वेदकाळात राजघराण्यातील स्त्रियांना स्वयंवराच्या माध्यमातून वर निवडण्याचा अधिकार होता. परंतु पुढील काळात स्त्रियांच्या विवाहावर बंधने आली. राक्षस विवाह, पैशाच्च विवाह, असे अनेक विवाहाचे प्रकार प्रचलित होते.

वेदकाळात सभा समितीच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकारणातील समावेश लक्षणीय दिसून येतो.

⑩ शिक्षण व्यवस्था :-

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये शिक्षण व्यवस्था ही जातीच व्यवस्थेने प्रभावित झालेली होती. यामध्ये ब्राम्हण वर्गाची मक्तेदारी आपल्याला पहायला मिळते. शिक्षणासाठी गुरुगृही राहून आपले शिक्षण पूर्ण करावे लागत असे. यालाच गुरुकुल व्यवस्था असेही म्हटले गेले आहे.

यामध्ये ब्राम्हण वर्गाला शिक्षण, विद्यादान व वेदाध्ययन व पौरोहित्याचे काम करावे लागत असे.

प्राचीन काळात क्षत्रिय समाजाला समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली असल्याने त्यांना युद्ध कलेचे शिक्षण दिले जात असे.

प्राचीन काळात वैश्य समाजाने व्यापार - वाणिज्य नियंत्रित व सुचारूपणे चालवण्यासाठी त्यांना व्यापार वाणिज्याचे शिक्षण दिले जात असे.

प्राचीन काळात शिक्षणाचा अधिकार शुद्र म्हणजेच बहुजन समाजाला व स्त्रियांना नाकारला गेला होता.

⑪ गुलामगिरी :-

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये गुलामगिरी मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. युद्धामध्ये पराभुत झालेल्या युद्ध कैद्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना

गुलाम म्हणून जीवन जगावे लागत असे. तसेच गुलामांची खरेदी विक्रि बाजाराद्वारे केली जात असे. पुरुष व स्त्री गुलामांची खरेदी विक्री होत असे. पुरुष गुलाम त्यांच्या कार्य करण्याच्या वय व ताकतीनुसार त्याचे दर ठरत असत. स्त्री गुलामांच्या सुंदरतेवर त्यांचे दर ठरलेले असत. विदेशी व्यापाराव्दारे गुलामांची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणावर होत असे.

## मनोरंजन व करमणुकीची साधने :-

प्राचीन काळात मनोरंजनासाठी व करमणुकीसाठी विविध प्राण्यांच्या झुंजी व शर्यती चे आयोजन केले जात असे. यामध्ये मेंढ्यांच्या टक्करी, बैलगाडी व घोड्याच्या रथ शर्यती व कोंबड्यांच्या झुंजी चा समावेश होतो. तसेच मनोरंजनासाठी द्युत व सारीपाठासारखे खेळ प्रचलित होते. विविध वाद्यांच्या माध्यमातून संगित, नृत्य व नाट्य ही मनोरंजनाची विविध माध्यमे होती. तसेच धार्मिक यात्रा, सण - उत्सव समारंभ याद्वारे देखील समाजाला विरंगुळा प्राप्त होत असे.

## औषधे :-

प्राचीन काळात विविध रोगांचे कारण शोधून त्यावर उपाय आयुर्वेदाव्दारे शोधले गेलेले आपणास दिसून येते. यासाठी निसर्गात उपलब्ध असणाऱ्या वनस्पतींचा वापर केला जात असे. वैद्य विविध वनस्पतींच्या काढ्यापासून रोग्यांना आजारातून बरे करत असत. त्यामध्ये तुळस, कडुलिंब, कोरफड या व यासारख्या निसर्गात उपलब्ध असणाऱ्या विविध वृक्ष व वनस्पतींचा वापर औषध म्हणून मोठ्या प्रमाणावर केला जात असे.

(14) संस्कार :-

हिंदू समाजव्यवस्थेत संस्कारांना फार मोठे स्थान आहे. संस्कार म्हणजे संस्करण व संस्करण म्हणजे कोणतीही गोष्ट शुद्ध करण्यासाठी तिच्यातील दोष नष्ट करण्यासाठी केलेली कृती. जसे केलेले कोणतेही कर्म वाया जात नाही. ते बरे-वाईट परिणाम घडवून आणते. तसेच संस्कार हाही कर्मच असल्यामुळे तोही आपला परिणाम घडवून आणतोच. हिंदू धारणेनुसार संस्काराने तीन प्रकारचे परिणाम घडून येतात.

① व्यक्तीचे देह व मन शुद्ध करण्यास मदत होते.
② सृष्टीत वास करणाऱ्या परंतु इंद्रियगोचर नसणाऱ्या अंतिद्रिय शक्ती (ह्यानांच देवता म्हणतात) ह्यांचे सहाय्य मिळते.
③ भोवतालचे वातावरण शुद्ध व पोषक होऊन इष्टफल देण्यास उपकारक बनते. हिंदू-धर्मात एकंदर सोळा संस्कार सांगितले आहेत. गर्भाधान, पुंसवन, सीमन्तोनयन जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, अन्नप्राशन, चूडाकर्म उपनयन, मेधाजनन, वगैरे सोळा संस्कार. हा अंत्यष्टीचा आहे.

10

Name – Rajvardhan Shivaji Koundade

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

52570

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| Signature of Supervisor | |
|---|---|

Suppliment No. :

Roll No. : 4156

Class : B.A. II year

Subject : History major

Test / Tutorial No. :

Div. :

(7/10) Zdragte

1) मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

उत्तर मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पाहण्यापूर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे –: भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच त्या साम्राज्याच्या कालखंडाला इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली, आणि चाणक्याच्या मार्गदर्शनाने राजवंशाचा पाया केला साम्राज्याने शिखर चंद्रगुप्ताच्या नातू अशोक द ग्रेट यांच्या अधिपत्याखाली गाठले कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्म स्वीकारल्याची प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकिर्दीत नैतिक तत्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांच्या प्रसार उपायांवर संपूर्ण साम्राज्यात शिलालेख कोरलेले त्यांचे खडक आणि स्तंभ शिलालेख त्यांच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणून काम करतात मौर्य राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्याचा हळूहळू ऱ्हास होत गेला.

मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

मौर्यकालीन समाजातील व्यवस्थेची माहिती मिळालेल्या

माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते मागणी तिजने लिहलेला इंडिका, त्या ग्रंथात तसेच केटिल्याच्या अर्थ शास्त्रात ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकिय जीवनाचे वर्णन करण्यात आले.

सामाजिक परिस्थितीचे मुद्दे पुढील प्रमाणे :-

1) वर्णव्यवस्था :- मौर्य कालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता समाजात ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण अस्तित्वात होते या काळात जाती व्यवस्था जाहिस स्वरूपाची होती प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती मॅगेस्थेनिज लिहिलेल्या इंडिका या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जातीचा उल्लेख आहे

2) आश्रमव्यवस्था :- मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये आधारित होता ब्रह्मचर्य आश्रमात वयाच्या 25 वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहून धर्मांच अध्ययन करीत असे पुढील 25 वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेऊन ग्रहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करित असे संन्यास आश्रमातील मोक्ष प्राप्ती मिळण्यासाठी त्याचा प्रयत्न असे.

3) संयुक्त कुटुंब पद्धती :- संयुक्त कुटुंब पद्धत तसेच कुटुंबपद्धत होती होती म्हणजे कुटुंबात आधारण वितरण तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत तसेच कुटुंबाचा प्रमुख असे मॅगेस्थेनिजने सांगितले कि लोक सुख समाधानी राहत होते. व घरात कुटुंब सोबत असे

4) विवाह पद्धती :- मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरा आधारित केले जात होते स्त्रीचे वर्षे 12 व मुलाचे वय 16 वर्ष विवाहासाठी योग्य समजले जाते, सोबत कुटुंबाला जन्म

देणे हा विवाहाच्या योग्य समजले जाते. विवाहाचा प्रमुख घटक असे पद्धती पुनर्विवाह नियोग पद्धती हुंडी पद्धती घटस्फोटाची प्रथा मौर्य काळात अस्तित्वात होती.

5) **अन्न :-** लोक शाकाहारी व मांसाहारी होते दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहू, ज्वारी अन्न म्हणून वापरत असे. मौर्यकाळातील लोक पशु-पक्षी चे मांस खात होते अशोकाने काही काळासाठी पशु हत्येवर बंदी घातली असेल.

6) **पोशाख :-** मौर्यकाळातील लोक वस्त्र, वस्त्रे, वापरत पुरुष गुडघ्यापर्यंत अंतरावरून बांधावरून वरती सारखे वापरलेले वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकालीन लोक कर्णफुले, हार बाजूबंद व कंबरपट्टा हे विविध प्रकारचे अलंकार घालत होते स्त्री व पुरुष मात्र सारखे अलंकार घालत होते.

7) **मनोरंजन :-** मेगॅस्थिनीजच्या मते रथदौड, घोडदौड आणि लढणाऱ्यांचे युद्ध या द्वारे मनोरंजन होऊ असे अर्थशास्त्र नुसार गायन, वादन, नर्तक व विदूषक यांच्या कलाप्रदर्शना मध्ये ही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे खेड्यात सार्वजनिक शाळांमध्ये नाटकीय उत्सव स्वरूपाचे आयोजन केले जात असे.

8) **स्त्रियांची स्थिती :-** मौर्यकाळामध्ये सामाजिक स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत असे. आणि कुटुंबामध्ये ही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते कौटिल्याच्या मते, संकट प्रसंग सोडता स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला पण दंड करत असे.

आणि व्यभिचाराचा अपराध केला तर त्याला पण दंड नसत असे. दंड केला पाहिजे पावकळणा गरजा निष्कर्ष निघतो की मौर्यकाळातील जरी स्त्रियांना सन्मानाचे वागणूक मिळत होती. परंतु स्वातंत्र्य नव्हते तिच्यावर स्वातंत्र्य नव्हते तिच्यावर पतीचे बंधन होते पण असे मौर्यकाळात स्त्रियांना पुनर्विवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

मॅगस्थेनिस वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे असे म्हणता येईल. कि मौर्यकालातील सामाजिक स्थिती ही आजच्या सामाजिक स्थितीपेक्षा संतुलित कोणती होती संयुक्त कुटुंब पद्धत मनोरंजनाची. साधने, मल्ल, पोशाख, दागिने आणि वगळता. मौर्यकाळातील ज्या प्रथा होत्या उदा. आश्रमव्यवस्था पुनर्विवाह हुंडा पद्धत विवाहाच्या पद्धती या पूर्वीचे बहुसंख्यात आले काही प्रथा ही बंद ही झाल्या आहेत मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती ही तत्कालीन काळातील काही प्रथा आणि वगळता मानवी समाजाला सुयोग्य होती असे म्हणता येईल.

NAME - Prasad Ashok Londhe .. class - BA . I History = Major .
Roll - 4311

6/10 — [signature]

| प्र. क्र. Q. No. | |
|---|---|
| 1 | मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा. |

उत्तर → मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पाहण्यापूर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे :-

* भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच या साम्राज्याचा कालखंडाच्या इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली, ज्याने चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली नंद राजवंशाचा पाडाव केला साम्राज्याचे शिखर चंद्रगुप्ताच्या नातू अशोक द ग्रेट यांच्या अधिपत्याखाली आले कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकीर्दीत नैतिक तत्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांच्या प्रसार झाला संपूर्ण साम्राज्यात विस्तारित केलेले त्यांचे खडक आणि स्तंभ शिल्प त्यांच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणून काम करतात. मौर्य राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर, मौर्य साम्राज्याचा हळूहळू ऱ्हास होत गेला.

* मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल

मौर्यकालीन मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते मेगॅस्थेनिजने लिहलेल्या 'इंडिका' या ग्रंथात तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकिय जीवनाचे वर्णन करण्यात आले

सामाजिक परिस्थितीचे मुद्दे पुढील प्रमाणे :-

1) वर्णव्यवस्था :- मौर्य कालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता समाजात ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण अस्तित्वात

प्र. क्र.
Q. No.

होते या काळात जातीव्यवस्था जटिल स्वरूपाची होती प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जातीचा उल्लेख आहे.

२) आश्रमव्यवस्था :- मनुष्याचे जिवन हे आश्रमामध्ये आधारित होते ब्रम्हचर्य आश्रमात वयाच्या २५ वर्षापर्यंत व्यक्ती ब्रम्हचारी राहून धर्माचे अध्ययन करित असे. पुढील २५ वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेऊन गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करित असे, शेवटी संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करित असे. संन्यास आश्रमातील मोक्ष प्राप्ती मिळवण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे.

३) संयुक्त कुटुंब पद्धती :- संयुक्त कुटुंब पद्धत तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धत होती. एका कुटुंबात साधारणतः तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख असे. मॅगेस्थेनिजने सांगितले की 'लोक सुख समृद्धीने राहत होते व घराला कुलूप लावत नसे

४) विवाह पद्धती :- मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जात होते मुलीचे वर्षे 12 व मुलाचे वय 16 वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. अनेक पुत्रांना जन्म देणे हा विवाहाचा प्रमुख घटक असे. स्वयंवर पद्धती, पुर्नविवाह, नियोग पद्धती, हुंडा पद्धती घटस्फोटाची प्रथा मौर्य काळात अस्तित्वात होती.

प्र. क्र.
Q. No.

५) अन्न :- लोक शाकाहारी व मांसाहारि होते दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, धान्य, जव, गहू, ज्वारी, अन्न म्हणून वापरत असे. मौर्यकाळातील लोक पशु-पक्षी चे मांस खात होते. अशोकाने काही काळानंतर पशु हत्तेवर बंदी घातली होती.

६) पोशाख :- मौर्यकाळातील लोक सुती वस्त्रे, वापरत. पुरुष गुडघ्यापर्यंत अंतवस्त्र खांद्यावरून चादरी सारखे पांघरायचे वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकालीन लोक कर्णफुले, हार, बाजुबंद व दस्तबंद हे विविध धातुचे अलंकार घालत होते. स्त्री व पुरुष दोघेसारिखे अलंकार घालत होते.

७) मनोरंजन :- मॅगेस्थिनिजच्या मते 'रथदौड, खोडदौड आणि सांडाचे युद्ध याद्वारे मनोरंजन होत असे. 'अर्थशास्त्रानुसार 'गायन, वादक, नरतर्तक वाग्विज यांच्या कला प्रदर्शन मुळे ही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सार्वजनिक शाळामध्ये सामूहिक उत्सव असवाचे ~~कि~~ आयोजन केले जात असे.

८) स्त्रियांची स्थिती :- मौर्यकाळामध्ये सामान्यतः स्त्रियांना सन्मानाची वागणुक मिळत असे. आणि कुटुंबामध्ये ही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते. कौटिल्याच्या मते, 'संकट प्रसंग सोडता) स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला ६ पण दंड केला पाहिजे आणि पतीच्या आज्ञेशिवाय पत्नी बाहेर गेली तर १२ पण दंड केला पाहिजे. यावरून असा.

प्र. क्र.
Q. No.

निष्कर्ष निघतो की मौर्यकाळामध्ये जरी स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत होती. परंतु स्वातंत्र्य नव्हते. तिच्यावर पतीचे बंधन होते. राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. मौर्यकाळात स्त्रीयांना पुर्नविवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

6

एकंदरित वरील सर्व मुद्दयांच्या आधारे असे म्हणता येईल की मौर्यकाळातील सामाजिक स्थिती ही आजच्या सामाजिक स्थितीपेक्षा संपूर्णत: वेगळी होती. संयुक्त कुटुंब पद्धत, मनोरंजनाची साधने, अन्न, पोशाख यासारख्या बाबी वगळता, मौर्यकाळातील ज्या प्रथा होत्या उदा. आश्रमव्यवस्था पुर्नविवाह हुंडा पद्धत विवाहाच्या पद्धती या पूर्णपणे बदलल्यात आहेत काही प्रथा ही बंद ही झाल्या आहेत. मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती ही तत्कालीन ~~कालीन~~ काळातील काही प्रथा / बाबी वगळता मानवी समाजाला अयोग्य होती असे म्हणता येईल.

नाव - क्षितीज विजय कांबळे
रोल नंबर - 5107
B.A.I
विषय - इतिहास

7/10

प्र. मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

→ • मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती प्राण्यापूर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच या साम्राज्याच्या कालखंडाला इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली, ज्याने चाणक्याच्या मार्गदर्शनाखाली नंद राजवंशाचा पाडाव केला. साम्राज्याचे शिखर चंद्रगुप्ताचा नातू अशोक द ग्रेट याच्या अधिपत्याखाली आले. कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकिर्दीत नैतिक तत्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांचा प्रसार झाला. संपूर्ण साम्राज्यात विनरित केलेले त्याचे खडक आणि स्तंभ शिल्प, त्याच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणून काम करतात. मौर्यांची राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले. सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर, मौर्य साम्राज्याचा हळूहळू ऱ्हास होत गेला.

• मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

:- मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते. मॅगेस्थेनिजने लिहिलेल्या 'इंडिका' या ग्रंथात तसेच कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन करण्यात आले.

: सामाजिक परिस्थितीचे मुद्दे पुढीलप्रमाणे :-

1) वर्णव्यवस्था -: मौर्यकालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता. समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण अस्तित्वात होते. या काळात जातीव्यवस्था जटिल स्वरूपाची होती, प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जातींचा उल्लेख आहे.

2) आश्रमव्यवस्था -: मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये विभागले होते. ब्रह्मचर्य आश्रमात वयाच्या 25 व्या वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहून धर्माचे अध्ययन करीत असे. पुढील 25 वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेऊन गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करीत असे. शेवटी संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करीत असे. संन्यास आश्रमामध्ये मोक्षप्राप्ती मिळवण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे.

३) संयुक्त ~~कु~~ कुटुंब पद्धती :- संयुक्त कुटुंब पद्धत तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धत होती. एका कुटुंबात साधारणत: तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख असे. आंतरजातीय विवाह व बहुपत्नी विवाहाच्या पद्धतीमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीस धोका निर्माण झाला. मॅगेस्थेनिजने सांगितले की, 'लोक सुख व समृद्धीने राहत होते व घराला कुलूप लावत नव्हते'.

४) विवाह पद्धती :- मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जात होते. मुलीचे वय 12 वर्ष तर मुलाचे वय 16 वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. विवाह शक्यतो जातीत होत. पण तरीही आंतरजातीय विवाह झाल्याचे आपणास दिसून येते. अनेक पुत्रांना जन्म देणे हा विवाहाचा प्रमुख उद्देश होता. स्वयंवर पद्धती, पुनर्विवाह, नियोग पद्धती, हुंडा पद्धती, घटस्फोटाची प्रथा मौर्यकाळात अस्तित्वात होती.

५) अन्न :- लोक शाकाहारी व मांसाहारी होते. दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहू अन्न म्हणून वापरत असे. मौर्यकालीन लोक पशु-पक्षांचे मांस खात होते. अशोकाने काही काळाने पशु हत्येवर बंदी घातली होती. नशीले द्रव्य व मदिरा घेण्याची प्रथा प्रचलित होती. यज्ञाच्या प्रसंगी लोक मंदिरात जात असत, असा मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात उल्लेख आहे.

६) पोषाख :- मौर्यकाळातील लोक सुती वस्त्रे वापरत. पुरुष गुडघ्यापर्यंत अंतर्वस्त्र, खांद्यावरून चादरी सारखे पांघरलेले वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकालीन लोक कर्ण फुले, हार, बाजूबंद व हस्तबंद हे विविध धातूंचे अलंकार घालत होते. स्त्री व पुरुष एकसारखे दागिने वापरत असत. श्रीमंत व मध्यम नागरिकांच्या राहणीमानात थोडी तफावत होती.

७) मनोरंजन :- मॅगेस्थेनिजच्या मते, "रथदौड, घोडदौड आणि सांडाचे युद्ध या द्वारे मनोरंजन होत असे". 'अर्थशास्त्रा' नुसार गायक, वादक, नरनर्तक, वाग्विज यांच्या कला प्रदर्शन मुळेही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सार्वजनिक शाळांमध्ये सामूहिक उत्सव उत्सवाचे आयोजन केले जात असे. सामाजिक दृष्टीने विचार करता मनोरंजन करणे हे त्या काळातील लोकांचे अविभाज्य अंग बनले होते.

४) स्त्रियांची स्थिती :- मौर्यकाळामध्ये समाजातील स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत असे आणि कुटुंबामध्येही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते. कौटिल्याच्या मते, " संकट प्रसंग सोडला स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला 6 पण दंड केला पाहिजे आणि पतीच्या आज्ञेशिवाय पत्नी बाहेर गेली तर 12 पण दंड केला पाहिजे" यावरून असा निष्कर्ष निघतो की मौर्य काळामध्ये जरी स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत होती परंतु स्वातंत्र्य नव्हते. त्यांच्यावर पतीची बंधने होती. "स्त्रिया फक्त पुत्रप्राप्तीच असतात", असेही कौटिल्याने म्हटले आहे. राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. मौर्यकाळात स्त्रियांना पुनर्विवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

एकंदरीत, वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे असे म्हणता येईल की, मौर्यकालातील सामाजिक स्थिती ही आजच्या सामाजिक स्थितीपेक्षा संपूर्णतः वेगळी होती. संयुक्त कुटुंब पद्धत, मनोरंजनाची साधने, अन्न, पेशाख यासारख्या बाबी वगळता मौर्यकालीन ज्या प्रथा होत्या, उदा. आश्रमव्यवस्था, पुनर्विवाह, हुंडा पद्धत, विवाहाच्या पद्धती या पूर्णपणे बदलल्या आहेत. काही प्रथा बंदही झाल्या आहेत. मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती ही तत्कालीन काळातील काही प्रथा / बाबी वगळता मानवी समाजाला सुयोग्य होती असे म्हणता येईल.

Name - Aditya Nitin kadam

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

52039

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :

Roll No. : 4089.

Class : BA - FY

Subject : History (Minor)

Test / Tutorial No. : 6/10

Div. :

प्र. मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

उ. मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पाहण्यापूर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच या साम्राज्याच्या कालखंडाला इतिहासात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली, ज्याने चाणक्यांच्या मार्गदर्शनाखाली नंद राजवंशाचा पाडाव केला. साम्राज्याचे शिखर चंद्रगुप्ताचा नातू अशोक द ग्रेट याच्या अधिपत्याखाली आले. कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकिर्दीत नैतिक तत्त्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांचा प्रसार झाला. संपूर्ण साम्राज्यात वितरित केलेले त्याचे खडक आणि स्तंभ शिलालेख, त्याच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणून काम करतात. मौर्यांची राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले. सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर, मौर्य साम्राज्याचा हळूहळू ऱ्हास होत गेला.

मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते. मॅगेस्थेनिजने लिहिलेल्या 'इंडिका'

या ग्रंथात तसेच कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन करण्यात आले.

मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल:-

1) वर्णव्यवस्था:- मौर्यकालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता. समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे चार वर्ण अस्तित्वात होते. या काळात जातीव्यवस्था जटिल स्वरूपाची होती. प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. मॅगिस्थेनिजने लिखित 'इंडिका' या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जातींचा उल्लेख आहे.

2) आश्रमव्यवस्था :- मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये विभागले होते. ब्रह्मचर्या आश्रमात वयाच्या 25 व्या वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहून धर्माचे अध्ययन करीत असे. पुढील 25 वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेऊन गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करीत असे. शेवटी संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करीत असे. संन्यास आश्रमामध्ये मोक्षप्राप्ती मिळवण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे.

3) संयुक्त कुटुंब पद्धती :- संयुक्त कुटुंब पद्धत तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धत होती. एका कुटुंबात साधारणतः तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख असे. आंतरजातीय विवाह व बहुपत्नी विवाहाच्या पद्धतीमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीस धोका निर्माण झाला. मॅगेस्थेनिजने सांगितले की, 'लोक सुख व समृद्धीने राहत होते व घराला कुलूप लावत नव्हते.

4) विवाह पद्धती :- मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जात होते. मुलीचे वय 12 वर्ष तर मुलाचे वय 16 वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. विवाह शक्यतो जातीत होत. पण तरीही आंतरजातीय विवाह झाल्याचे आपणास दिसून येते. अनेक पुत्रांना जन्म देणे हा वि

विवाहाचा प्रमुख उद्देश होता. स्वयंवर पद्धती, पुनर्विवाह, नियोग पद्धती, घटस्फोटाची प्रथा मौर्यकाळात अस्तित्वात होती.

5) अन्न :- लोक शाकाहारी व मांसाहारी होते. दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहू, अन्न म्हणून वापरत असे. मौर्यकालीन लोक पशु-पक्षांचे मांस खात होते. अशोकाने काही काळाने पशु हत्येवर बंदी घातली होती. नशीले द्रव्य व मदिरा घेण्याची प्रथा प्रचलित होती. यज्ञाच्या प्रसंगी लोक मंदिरात जात असत, असा मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात उल्लेख आहे.

6) पोषाख :- मौर्यकाळातील लोक सुती वस्त्रे वापरत. पुरुष गुडघ्यापर्यंत अंतर्वस्त्र, खांद्यावरून चादरी सारखे पांघरलेले वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकालीन लोक कर्णफुले, हार, बाजूबंद व दस्तबंद हे विविध धातूंचे अलंकार घालत होते. स्त्री व पुरुष एकसारखे दागिने वापरत असत. श्रीमंत व मध्यम नागरिकांच्या राहणीमानात थोडी तफावत होती.

7) मनोरंजन :- मॅगेस्थेनिजच्या मते, " रथदौड, घोडदौड आणि सांडाचे युद्ध या द्वारे मनोरंजन होत असे." अर्थशास्त्रा नुसार गायक, वादक, नरनर्तक, वाग्विज यांच्या कला प्रदर्शन मुळेही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सार्वजनिक कामांमध्ये सामूहिक उत्सवाचे आयोजन केले जात असे. सामाजिक दृष्टीने विचार करता मनोरंजन करणे हे त्या काळातील लोकांचे अविभाज्य अंग बनले होते.

8) स्त्रियांची स्थिती :- मौर्यकाळामध्ये समाजातील स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत असे आणि कुटुंबामध्येही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते. कौटिल्याच्या मते, " संकट प्रसंग सोडता स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला 6 पण दंड केला पाहिजे आणि पतीच्या आज्ञेशिवाय पत्नी बाहेर गेली तर 12 पण दंड केला पाहिजे." यावरून असा निष्कर्ष निघतो की मौर्य काळामध्ये जरी स्त्रियांना

सन्मानाची वागणूक मिळत होती परंतु स्वातंत्र्य नव्हते. तिच्यावर पतीची बंधने होती. "स्त्रिया फक्त पुत्रप्राप्तीच असतात", असेही कौटिल्याने म्हटले आहे. राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. मौर्यकाळात स्त्रियांना पुनर्विवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

समकंदरीत, वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे असे म्हणता येईल की, मौर्यकाळातील सामाजिक स्थिती ही आजच्या सामाजिक स्थितीपेक्षा संपूर्णतः वेगळी होती. संयुक्त कुटुंब पद्धत, मनोरंजनाची साधने, अन्न, पोशाख यासारख्या बाबी वगळता मौर्यकालीन ज्या प्रथा होत्या. उदा. आश्रमव्यवस्था, पुनर्विवाह, हुंडा पद्धत, विवाहाच्या पद्धती या पूर्णपणे बदलल्या आहेत. काही प्रथा बंदही झाल्या आहेत. मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती ही तत्कालीन काळातील काही प्रथा / बाबी वगळता मानवी समाजाला सुयोग्य होती असे म्हणता येईल.

6

Name:- Vaishnavi Sarjerao Urfe.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

52022

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Signature of Supervisor | |
| Subject : | History (Major) |
| Test / Tutorial No. : | 5/10 |
| Div. : | |

Suppliment No. :

Roll No. : 4290

Class : B.A.F.Y.

प्राचीन भारताचा इतिहास - भाग 2

प्रश्न 1 मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

⟹ **ऐतिहासिक प्रस्तावना :-** मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. अश्मयुगापासून मनुष्य गटागटाने राहत असे नंतर त्यांचा समाज बनला. समाज म्हणजे समूहात राहणाऱ्या व्यक्तींमध्ये असणारी संबंधाची व्यवस्था होय. प्राचीन भारतीय समाजरचनेचे एक वैशिष्ट्ये म्हणजे जाती व्यवस्था होय. जिने भारताच्या इतर सर्वच बाजूंना प्रभावित केले. मौर्य कालीन सामाजिक समाजव्यवस्थेची पुढील काही प्रमुख वैशिष्ट्ये सांगता येतील.

1) **वर्णव्यवस्था :-** जीवाचे परमात्म्याशी संमिलन घडवून आणणे म्हणजेच मोक्ष संपादन करणे होय. जे जीवाचे अंतिम ध्येय मानले गेले. पण हे ध्येय संपादन करणे हे काहीही तितकेच कठिण आहे. वर्णक्रमामध्ये यज्ञ, तप, संस्कार इत्यादींची योजना करण्यात आली. वर्णव्यवस्था हि गुणकर्मावर आधारित समाजव्यवस्था त्या व्यवस्थेनुसार समाजाची ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार

वर्णात विभागणी झाली. प्रत्येकाने आपआपल्या वर्णानुसार कर्मे करावी. हजारो वर्षे ह्याच वर्णव्यवस्थेने समाज स्थिर राखण्याचे कार्य केले. व व्यक्ति आणि समाजाची ह्या दोन्हींची उन्नती करून दाखविली. वर्णव्यवस्थेमध्ये उच्चनीचता अथवा जातीभेद पाळले नव्हते

(२) **जातीव्यवस्था :-**

जातीव्यवस्था हि मौर्यकालीन सामाजिक समाजाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे. एका विद्वान पुरुषाच्या मुखातून ब्राह्मणाची निर्मिती, बाहूतून क्षत्रियांची निर्मिती, मांड्यातून वैश्यांची निर्मिती, तळपायातून शूद्रांची निर्मिती असल्याचे ऋग्वेदाच्या पुरुषसुक्तात म्हटले आहे. ब्राह्मणांना सर्वोच्च जात मानले जात असे आणि त्यांना समाजात सर्वाधिक शक्ती आणि विशेषाधिकार प्राप्त होते. धार्मिक विधी करणे, धार्मिक ग्रंथ शिकवणे आणि राजे आणि राज्यकर्त्यांना सल्ला देणे हि त्यांची जबाबदारी होती.

(३) **आश्रम व्यवस्था :-**

आश्रम व्यवस्था हि वर्णव्यवस्थेशी संलग्न आहेत. वर्ण व्यवस्था हि समाजातील संघर्ष व स्पर्धा टाळण्यासाठी केलेली समाजव्यवस्था आहे. तशीच आश्रमव्यवस्था हि व्यक्ति व समाज ह्या दोहोंच्या विकासासाठी असून ह्या व्यवस्थेमुळे वयोमानानुसार वाढत जाणाऱ्या पिपासेवर (काम, पिपासा, वित्त पिपासा) सुयोग्य नियंत्रण घालण्यात आले आहे ह्या आश्रमव्यवस्थेमुळे मानवी आयुष्याचे ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम व संन्यासाश्रम असे चार विभाग पाडण्यात आले असून प्रत्येकाने त्या त्या आश्रमात त्या वयाला अनुरूप अशी कर्तव्ये करावी अशी बंधने घालण्यात आले. समाजातील सत्ता व वित्त ह्यातून निर्माण होणारे संघर्ष टाळण्यासाठी गृहस्थाश्रमानंतर प्रत्येक व्यक्तिने वानप्रस्थाश्रम व त्यानंतर संन्यासाश्रम घ्यावा अशी अपेक्षा केली. प्राचीन काळामध्ये असा समाज होता कि मानवी आयुष्याचे व शंभर मानून 25 वर्षांचे त्याचे चार भाग पाडले होते.

४) कुटुंब व्यवस्था :-

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये संयुक्त कुटुंब व्यवस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारतीय कुटुंब व्यवस्था हि भारतीय समाजाचा आणि भारतीय संस्कृतीचा कणा आहे. आपल्या पुढच्या पिढीला, सहज दैनंदिन व्यवहारातून संस्कारांची सवय लावण्याचे कार्य, पिढ्यानपिढ्या कुटुंब व्यवस्थेतून होत आहे. प्राचीन काळामध्ये भारतीय कुटुंब व्यवस्था हि पितृसत्ताक पद्धतीची होती. ज्यामध्ये हिंदू वारसा कायद्यानुसार मोठ्या मुलाचा मोठा मुलगा त्या घरचा कर्ता पुरुष मानला जात होता. कुटुंबामध्ये त्याची बायको सह त्यांची मुले त्यांच्या बायका मुले गुण्या गोविंदाने राहत असत. आधुनिक युगात औद्योगिकरण व नागरीकरण ह्यामुळे संयुक्तकुटुंब व्यवस्था खिळखिळी झाली आहे. पण अजून हि ती कायम आहे. व भविष्यातही ती कायम राहील असे दिसते ह्याचे कारण तिच्या ठिकाणी असणारी समाज हितकारक तत्वे दुसऱ्या कोणत्याही समाजात हिंदू समाजइतकी दृढ व सुसंघटित संयुक्त कुटुंबव्यवस्था आढळत नाही.

५) चार पुरुषार्थ :

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये चार पुरुषार्थांना महत्त्व आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. प्राचीन काळी प्रत्येक व्यक्तीने ह्या चार गोष्टी संपादन करावेत असे अपेक्षित आहे. उपनिषदांच्या मतानुसार 'धर्म' हाच सर्व विश्वाचा आधार आहे. धर्मामुळे ऐहिक व पारलौकिक कल्याण होते असे गीतेचे म्हणणे आहे. धर्माच्या साह्याने व्यक्ती अर्थ व काम ह्या दोन पुरुषार्थांना नियंत्रित ठेवते व मोक्षाच्या मार्गावर वाटचाल करू लागते. व्यक्तीवर नियंत्रण ठेवून समाजाची धारणा करणे हेहि धर्माचे कार्य आहे. धर्मामुळे व्यक्ती आणि समाज, समाज व राजकारण ऐहिक कल्याण व पारमार्थिक कल्याण ह्या दोहोंचा आदर्श समन्वय करते, अशी हि धर्मासंबंधी विशाल कल्पना आहे. अर्थ व काम ह्यांनी शारीरिक व मानसिक सुख प्राप्त होते. पण हे दोन पुरुषार्थ संपादन करताना व्यक्तीने स्वार्थी व स्वैर होऊ नये म्हणून धर्म

हा पुरुषार्थ ह्या दोन पुरुषार्थांवर नियंत्रण ठेवतो. मोक्ष हा सर्व पुरुषार्थ: मानवाचे सर्वश्रेष्ठ ध्येय. मोक्ष म्हणजे जीवाशिवाचे ऐ अर्थ व काम हे दोन पुरुषार्थ संपादन करताना धार्मिक बंधन अथवा नियंत्रण पाळून मोक्षाच्या ध्येयमार्गावर वाटचाल करित रहावे अशी हि व्यक्ती व समष्टीच्या दृष्टीने कल्याणकारक असलेली योजना म्हणजेच पुरुषार्थ होय.

6) विवाह पद्धती :

प्राचीन भारताच्या वैविध्यपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात विवाह संस्थेची महत्त्वपूर्ण भूमिका होती. प्राचीन भारतीय विवाह पद्धतीमुळे तत्कालीन. परंपरा चालीरिती आणि धार्मिक श्रद्धांची माहिती आपणास प्राप्त होते. प्राचीन भारतीय समाजामध्ये अनेक प्रकारचे विवाह प्रचलित होते. ज्यामध्ये ब्रह्मविवाह, दैवविवाह, आर्षविवाह, प्रजापत्यविवाह, गंधर्वविवाह आणि असुर विवाह यांचा समावेश होता. सर्वात उदात्त मानल्या जाणाऱ्या ब्रह्मविवाहमध्ये वराने वधूच्या कुटुंबाला भेटवस्तू देणे समाविष्ट होते. ज्यामध्ये पत्नीने [illegible] करण्याचे कर्तव्य पतीबाबतचे स्वीकारते. दैवविवाह प्रकारात यज्ञात, वधूला पुजाऱ्याला बलिदानाची भेट म्हणून अर्पण केले जात असे. आर्षविवाहात गाय आणि बैल भेट दिले जात असे. तर प्रजापत्य विवाह हा पुरुष आणि स्त्री यांच्यातील एक साधा आणि ऐच्छिक मिलन होता. दुसरीकडे, गंधर्व विवाह हा परस्पर संमतीवर आधारित प्रेमविवाह होता, तर असुर विवाहात वराने वधूच्या कुटुंबाला वधूची किंमत देणे समाविष्ट होते. विवाह हे केवळ दोन व्यक्तींमधील मिलन नव्हते तर एक पवित्र बंधन होते जे जोडप्याच्या पलीकडे त्यांची कुटुंब आणि समुदायापर्यंत विस्तारले जात असे.

7) अन्न व आहार :

प्राचीन काळात समाजातील लोक हे शाकाहारी व काही प्रमाणात मांसाहारी असलेले दिसून येतात. शाकाहारामध्ये अन्नधान्य, कडधान्य, फळभाज्या, पालेभाज्या, व मसाल्याचे पदार्थ

यांचे सेवन केले जात असे. तसेच आहारामध्ये दूध, अंडी, मासे, मांस यांचाही वापर केला जात असे. बहुतांशी कांदा, लसूण, मांस तसेच मदिरेचे सेवन करणे वर्ज्य मानले होते.

८) अलंकार व आभूषणे :

प्राचीन काळात समाजातील स्त्री-पुरुष या प्रत्येक घटकांना अलंकार व आभूषणाची ~~ओढ~~ आवड होती. तत्कालीन लिखित व अलिखित साधनांच्या माध्यमातून व उत्खननात सापडलेल्या तुकड्यांच्या माध्यमातून अलंकार व आभूषणांची माहिती मिळते. ज्यामध्ये सोने, चांदी, तांबे, पितळ याचबरोबर विविध मौल्यवान धातू, हिरे, मोती यांचा समावेश अलंकारामध्ये केल्याचे दिसून येते. पुरुष हातामध्ये कडे, गळ्यामध्ये ताईत व सोन्याच्या माळा घालत असत. तसेच स्त्रिया कर्णभूषणे, नथ, बिंदी, पायातील पैंजण, जोडवे, कमरपट्टा, बाजूबंद, बांगड्या व गळ्यामध्ये सोन्या चांदीच्या हारांचा वापर करत असत. थोडक्यात प्राचीन भारतीय समाजामध्ये स्त्री व पुरुषांना अलंकार व आभूषणांचे मोठ्या प्रमाणावर ओढ असल्याने व्यापार वाणिज्य मध्ये या उद्योगधंद्यांना महत्त्वाचे स्थान प्राप्त होते.

९) वेशभूषा व केशभूषा :

प्राचीन काळात कापसापासून तयार झालेले व धाग्यावर विणलेले जाड भरड कापड वापरले जात असे, श्रीमंत व्यक्ति

रेशीम कापडाचा वापर करत असत. कपड्यांचा व्यापारामध्ये मोठी उलाढाल होत असे. पुरुष, धोतर, पागोटे, शेला व पंचा यांचा वापर करत असत. तर स्त्रिया साडी- चोळी यासारखी वस्त्रे परिधान करत असत. रेशीम युक्त सुती मलमल या कापडांचा समावेश लोक करत असत.

## 10 स्त्री जीवन :

प्राचीन काळात स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान दिले गेल्याचे दिसून येते. धार्मिक कार्य, सण, उत्सव, समारंभ याप्रसंगी स्त्रियांना महत्त्वाचे स्थान दिले गेले होते. परंतु मातृदेवता म्हणून गौरवलेले दिसून येते. वेद काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी, लोपामुद्रा या स्त्री विदुषींनी वेद अध्ययन करून वेद लेखनाचे काम ही केले आहे. परंतु वेद काळापासून स्त्रियांच्या शिक्षणाचा शिक्षणाचा अधिकार नाकारला जाऊन त्यावर बंधने घातली गेल्याची दिसून येते. वेदकाळात राजघराण्यातील स्त्रियांना स्वयंवराच्या माध्यमातून वर निवडण्याचा अधिकार होता. परंतु पुढील माध्यमातून ~~स्त्रि~~ स्त्रियांच्या विवाहावर बंधने आली. राक्षस विवाह ~~क्ष~~ पैशाच्य विवाह. असे अनेक विवाहाचे प्रकार प्रचलित होते.

वेदकाळात सभा समितीच्या माध्यमातून स्त्रियांचा राजकारणातील समावेश लक्षणीय दिसून येतो.

## 11 शिक्षण व्यवस्था :

प्राचीन भारतीय समाजव्यवस्थेमध्ये शिक्षण व्यवस्था ही जातीय व्यवस्थेने प्रभावित झालेली होती. यामध्ये ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी आपल्याला पहायला मिळते शिक्षणासाठी गुरुगृही राहून आपले शिक्षण पूर्ण करावे लागत असे. याला गुरुकुल व्यवस्था असेही म्हटले गेले आहे.

यामध्ये ब्राह्मण वर्गाला शिक्षण, बिद्यादान व वेदाध्ययन व पौरोहित्याचे काम करावे लागत असे

प्राचीन काळात क्षत्रिय समाजाला समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली असल्याने त्यांना युद्ध कलेचे शिक्षण दिले जात

असे. प्राचीन काळात शिक्षणाचा अधिकार शुद्र म्हणजेच बहुजन समाजाला व स्त्रियांना नाकारला गेला होता.

२) गुलामगिरी :

प्राचीन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये गुलामगिरी मोठ्या प्रमाणावर प्रचलित होती. युद्धामध्ये पराभूत झालेल्या युद्ध कैद्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना गुलाम म्हणून जीवन जगावे लागत असे. तसेच गुलामांची खरेदी विक्री बाजाराद्वारे केली जात असे पुरुष व स्त्री गुलामांची खरेदी विक्री असे. पुरुष गुलाम त्यांच्या कार्य करण्याच्या वय व ताकदीनुसार त्यांचे दर ठरत असे. स्त्री गुलामांच्या सुंदरतेवर त्यांचे दर ठरवले असत. विदेशी व्यापाराद्वारे गुलामांची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणावर होत असे.

३) मनोरंजन व करमणुकीची साधने :

प्राचीन काळात मनोरंजनासाठी व करमणुकीसाठी विविध प्राण्यांच्या झुंजी व शर्यतीचे आयोजन केले जात असे. यामध्ये मेंढ्यांच्या टक्करी, बैलगाडी व घोड्यांच्या शर्यती व कोंबड्यांच्या झुंजी या समावेश होतो. तसेच मनोरंजनासाठी द्यूत व सारीपाटासारखे खेळ प्रचलित होते. विविध वाद्यांच्या माध्यमातून संगीत, नृत्य व नाट्य हि मनोरंजनाची विविध माध्यमे होती. तसेच कुस्ती व मल्लयुद्ध याद्वारे देखील मनोरंजन होत असे. तसेच धार्मिक यात्रा, सण-उत्सव समारंभ याद्वारे देखील समाजाला विरंगुळा प्राप्त होत असे

४) औषधे :

प्राचीन काळात विविध रोगांचे कारण शोधून त्यावर उपाय आयुर्वेदाद्वारे शोधले गेलेले आपणास दिसून येते. यासाठी निसर्गात उपलब्ध असणाऱ्या वनस्पतींचा वापर केला जात असे. वैद्य विविध वनस्पतींच्या मुळ्यापासून रोग्यांना आजारातून बरे करत असत. त्यामध्ये तुळस, कडुलिंब, कोरफड या व यासारख्या निसर्गात उपलब्ध असणाऱ्या विविध वृक्ष व वनस्पतींचा वापर औषध

म्हणून मोठ्या प्रमाणावर केला जात असे.

5) **संस्कार:**

हिंदू समाजव्यवस्थेत संस्कारांना फार मोठे स्थान आहे. संस्कार म्हणजे संस्करण व संस्करण म्हणजे कोणतीही गोष्ट शुद्ध करण्यासाठी तिच्यातील दोष नष्ट करण्यासाठी केलेली कृती. असे केलेले कोणतेही कर्म वाया जात नाही. ते अदृष्ट परिणाम घडवून आणते, तसेच संस्कार हाही कर्मच असल्यामुळे तोही आपला परिणाम घडवून आणतोच.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's 52004

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Name - Samruddhi Sunil Patil

Suppliment No. :

Roll No. : 4218

Class : B.A. F.Y

Signature of Supervisor

Subject : History

Test / Tutorial No. :

Div. :

7/10

प्र. मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा

## मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती

समाजव्यवस्था

मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते. मॅगेस्थेनिजने लिहिलेल्या 'इंडिका' या ग्रंथात तसेच कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' ग्रंथात तत्कालीन सामाजिक आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन करण्यात आले

① वर्णव्यवस्था:- मौर्यकालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित हो समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण आस्तित्वात होते. 'इंडिया' या ग्रंथात जातीव्यवस्था जटील होती असे उल्लेख आहे. विवाह आपापल्या जातीतील स्त्री - पुरुषांशी होत असत.

प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असे त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. तत्कालीन समाज अनेक वर्गात विभागला गेला होता. मॅगेस्थेनिजने सात जातीचा उल्लेख केला आहे. ब्राह्मणांना समाजात सन्मान होता. अशोकाने ब्राह्मण आणि श्रमणांची सेवा करण्याची आज्ञा प्रजेला दिली होती. वैश्य वर्णातील लोकांना शेती करणे व व्यापार करणे हा अधिकार होता. शूद्रांना मात्र तीन वर्णातील लोकांची सेवा करूनच उदरनिर्वाह करावा लागत होता. क्षत्रियांना समाजात सन्मान होता.

2) आश्रमव्यवस्था :- मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये विभागले होते. ब्रह्मचर्य आश्रमात वयाच्या 25 व्या वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहुन धर्माचे अध्ययन करीत असे. वयाच्या 25 व्या वर्षापासुन ते 50 वर्षापर्यंत गृहस्थाआश्रमात जीवन व्यतित करावे लागत. या आश्रमात व्यक्ती वैवाहिक सुखाचा उपभोग घेत असे. यानंतर व्यक्ती वानप्रस्था आश्रमात प्रवेश करीत असे. शेवटी, संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करीत असे त्यानंतरच्या काळात व्यक्ती सन्यासी व तपस्वीचे जीवन जगत असे. मोक्षप्राप्ती मिळविण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे.

3) संयुक्त कुटुंब पद्धती :- संयुक्त कुटुंब पद्धती होती तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धती होती कुटुंबातील अनेक सदस्य एकत्र व एकमेकाशी प्रेमाने राहत असत. एका कुटुंबात साधारणता तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख होता. पित्याच्या मृत्युनंतर वडिल मुलगा म्हणजेच मोठा मुलगा हा कुटुंबाचा प्रमुख बनत असे असे. आंतरजातीय विवाह व बहुपत्नी विवाहाच्या पद पद्धतीमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीस धोका निर्माण झाला होता. तत्कालीन लोक ही खुप सत्यवादी, इमानदार व शक्तिशाली होते. त्या काळात चोरीच प्रमाण हे कमी होते. मॅगेस्थेनिजने सांगितले की, "लोक सुखी व समृद्धीने राहत होते व घराला कुलुप लावत नव्हते.

५] विवाह पद्धती :- मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जाते होते. मुलीचे वय १२ वर्षे तर मुलाचे वय १६ वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. ब्रह्म विवाह, प्रजापत्य विवाह, देव विवाह, आर्ष विवाह, असुर विवाह, गांधर्व विवाह, राक्षस विवाह, पैशाच्या विवाह हे विवाह आठ प्रकार मौर्य काळात प्रचलित असल्याचा उल्लेख अर्थशास्त्रात आहे. पहिले चार विवाहाचे प्रकार पवित्र तर शेवटचे चार विवाह प्रकार अपवित्र मानले जाते. विवाह शक्यतो जातीत होत. पण तरीही आंतरजातीय विवाह झाल्याचे आपणास दिसून येते. मॅगेस्थेनिजच्या मते, 'एक पिता आपल्या कन्येचा विवाह दोन बैल घेऊन करीत होता.' अनेक पुत्रांना जन्म देणे हा विवाहाचा प्रमुख उद्देश होता. एरिस्टोब्युलस या ग्रीक लेखकाने असे वर्णन केले की 'एका पित्याने आपली कन्या विकताना पाहिले होते.' स्वयंवर पद्धती, पुनर्विवाह, नियोग पद्धती, हुंडा पद्धती घटस्फोटाची प्रथा मौर्यकाळात अस्तित्वात होती.

५] अन्न :- लोक शाकाहारी व मांसाहारी होते. दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहू अन्न म्हणून उपयोग होत असे. मौर्यकालीन लोक पशु - पक्षांचे मांस खात होते. अशोकाने काही काळाने पशु हत्येवर बंदी घातली होती. नशीले द्रव्य व मंदिरा घेण्याची प्रथा प्रचलित होती. यज्ञाच्या प्रसंगी लोक मदिरामय होत असत असे मॅगेस्थेनिजने 'इंडिया' या ग्रंथात उल्लेख केला.

६] पोशाख :- लोक सुती वस्त्रे वापरत. पुरुष गुडघ्यापर्यंत अंतर्वस्त्र घालत होते. चादरी सारखे वस्त्र खांद्यावरून पांघरले जात असे. पुरुष पगडीचा वापर करीत. रेशमी व कुलनची वस्त्रे वापरत. रंगीबेरंगी कपडे व आकर्षक वस्त्रांचा वापर करत. त्या काळातील नागरिक कर्णफुले, हार, बाजुबंद व दसतबंद हे विविध धातूंचे अलंकार घालत होते. स्त्री व पुरुष एकसारखे दागिने वापरत असत. श्रीमंत लोक वस्त्रावर जरीचे काम करवून घेत.

7] मनोरंजन :- मॅगेस्थेनिजच्या मते, "रथदौड, घोडदौड आणि सांडाचे युद्ध या द्वारे मनोरंजन होत असे."
'अर्थशास्त्र' नुसार गायक, वादक, नरनर्तक, वाद्विज यांच्या कला प्रदर्शन मुळेही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सार्वजनिक शाळात सामुहिक उत्सवाचे आयोजन केले जात असे. सामाजिक दृष्टीने विचार करता मनोरंजन करणे हे त्या काळातील लोकांचे अविभाज्य अंग बनले होते.

8] स्त्रियांची स्थिती :- समाजात स्त्रियांना सन्मान होता. आणि कुटुंबातही त्यांना सन्मानाने वागविले जात होते. स्त्रिया स्वतंत्रपणे कोणतेही काम करू शकत होत्या. कौटिल्याच्या मते, "संकट प्रसंग सोडता स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला 6 पण दंड केला पाहिजे आणि पतीच्या आज्ञाशिवाय पत्नी बाहेर गेली तर, 12 पण दंड केला पाहिजे. यावरून निष्कर्ष निघतो मौर्य काळात स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. त्यांच्यावर पतीची बंधने होती. कौटिल्याने असेही म्हटले आहे, 'स्त्रिया फक्त पुत्र प्राप्तीसाठीच असतात.' राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. पडदा पद्धती होती. स्त्री हत्या करणाऱ्यास कठोर शिक्षा केली जात होती. स्त्रियांना आपल्या पतीसोबत धार्मिक उत्सवात भाग घेता येत होता. स्त्रियांना पुनर्विवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

Name - Sayali Popat Vadkar

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

52047

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :

Roll No. : 4293

Class : B.A.F.Y.

Subject : History (Major)

Test / Tutorial No. :

Div. :

7/10

प्र. मौर्यकालीन सामाजिक परिस्थितीची माहिती थोडक्यात स्पष्ट करा.

→ मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पाहण्यापूर्वी मौर्य साम्राज्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :-

भारताच्या प्राचीन इतिहासातील सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मौर्य साम्राज्याचा उल्लेख होतो. त्यामुळेच या साम्राज्याच्या कालखंडाला इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मौर्य साम्राज्याची स्थापना चंद्रगुप्त मौर्याने केली, ज्याने चाणक्यांच्या मार्गदर्शनाखाली नंद राजवंशाचा पाडाव केला. साम्राज्याचे शिखर चंद्रगुप्ताचा नातू अशोक द ग्रेट याच्या अधिपत्याखाली आले. कलिंग युद्धानंतर बौद्ध धर्म स्वीकारण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या अशोकाच्या कारकिर्दीत नैतिक तत्वे, अहिंसा आणि सहिष्णुता यांचा प्रसार झाला. संपूर्ण साम्राज्यात वितरित केलेले त्याचे खडक आणि स्तंभ शिल्प त्याच्या शासनाच्या ऐतिहासिक नोंदी म्हणून काम करतात. मौर्यांची राजधानी पाटलीपुत्र हे एक प्रमुख राजकीय आणि आर्थिक केंद्र बनले. सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर, मौर्य साम्राज्याचा हळूहळू ऱ्हास होत गेला.

- मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येईल. :- मौर्यकाळातील समाजव्यवस्थेची माहिती शिलालेख तसेच तत्कालीन साहित्यावरून मिळते.

मॅगेस्थेनिसने लिहिलेल्या 'इंडिका' या ग्रंथात तसेच कौटिल्याच्या 'अर्थशास्त्र' ग्रंथात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन करण्यात आले.
: सामाजिक परिस्थितीचे मुद्दे पुढीलप्रमाणे :-

1) वर्णव्यवस्था – मौर्यकालीन समाज हा पारंपारिक वर्णव्यवस्थेवर आधारित होता. समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण अस्तित्वात होते. या काळात जातीव्यवस्था जटिल स्वरूपाची होती, प्रत्येक जातीचा जो व्यवसाय ठरलेला असेल त्या व्यवसाय व्यतिरिक्त दुसरा व्यवसाय करण्याची परवानगी नव्हती. मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात तत्कालीन काळातील सात जातींचा उल्लेख आहे.

2) आश्रमव्यवस्था – मनुष्याचे जीवन हे आश्रमामध्ये विभागले होते. ब्रह्मचर्या आश्रमात वयाच्या 25 व्या वर्षापर्यंत व्यक्ती ब्रह्मचारी राहून धर्माचे अध्ययन करीत असे. पुढील 25 वर्षात मनुष्य वैवाहिक सुखाचा उपभोग घेऊन गृहस्थाश्रमातून वानप्रस्थाश्रमात प्रवेश करीत असे. शेवटी संन्यास आश्रमात व्यक्ती प्रवेश करीत असे. संन्यास आश्रमामध्ये मोक्षप्राप्ती मिळवण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे.

3) संयुक्त कुटुंब पद्धती – संयुक्त कुटुंब पद्धत तसेच पितृसत्ताक कुटुंबपद्धत होती. एका कुटुंबात साधारणत: तीन पिढ्यातील व्यक्ती एकत्र राहत असत. पिता कुटुंबाचा प्रमुख असे. आंतरजातीय विवाह व बहुपत्नी विवाहाच्या पद्धतीमुळे संयुक्त कुटुंब पद्धतीस धोका निर्माण झाला. मॅगेस्थेनिजने सांगितले की, 'लोक सुख व समृद्धीने राहत होते व घराला कुलूप लावत नव्हते.

4) विवाह पद्धती – मौर्यकाळात विवाह धर्मशास्त्र व परंपरावर आधारित केले जात होते. मुलीचे वय 12 वर्षे तर मुलाचे वय 16 वर्षे विवाहासाठी योग्य समजले जाते. विवाह शक्यतो जातीत होत. पण तरीही आंतरजातीय विवाह झाल्याचे आपणास दिसते.

अनेक पुत्रांना जन्म देणे हा विवाहाचा प्रमुख उद्देश होता. स्वयंवर पद्धती, पुनर्विवाह, नियोग पद्धती, हुंडा पद्धती, घटस्फोटाची प्रथा मौर्यकाळात अस्तित्वात होती.

5) अन्न – लोक शाकाहारी व मांसाहारी होते. दुधापासून तयार केलेले पदार्थ, फळे, भात, जव, गहू अन्न म्हणून वापरत असे. मौर्यकालीन लोक पशु-पक्षांचे मांस खात होते. अशोकाने काही काळाने पशु हत्येवर बंदी घातली होती. नशीले द्रव्य व मदिरा घेण्याची प्रथा प्रचलित होती. यज्ञाच्या प्रसंगी लोक मंदिरात जात असत. असा मॅगेस्थेनिज लिखित 'इंडिका' या ग्रंथात उल्लेख आहे.

6) पोषाख – मौर्यकाळातील लोक सुती वस्त्रे वापरत. पुरूष गुडघ्यापर्यंत अंतर्वस्त्र, खांद्यावरून चादरी सारखे पांघरलेले वस्त्र व पगडीचा वापर करत असे. मौर्यकालीन लोक कर्णफुले, हार, बाजुबंद, व दसतबंद हे विविध धातुंचे अलंकार घालत होते. स्त्री व पुरूष एकसारखे दागिने वापरत असे. श्रीमंत व मध्यम नागरिकांच्या राहणीमान थोडी तफावत होती.

7) मनोरंजन – मॅगेस्थेनिसच्या मते, 'रथदौड घोडदौड आणि सांडाचे युद्ध या द्वारे मनोरंजन होत असे. अर्थशास्त्रानुसार गायक, वादक, नरनर्तक, वाग्विज यांच्या कला प्रदर्शन मुळेही नागरिकांचे मनोरंजन होत असे. प्रमुख सणाच्या प्रसंगी नृत्य केले जात असे. खेड्यात सार्वजनिक शाळांमध्ये सामूहिक उत्सवाचे आयोजन केले जात असे. सामाजिक दृष्टीने विचार करता मनोरंजन करणे हे या काळातील लोकांचे अविभाज्य अंग बनले होते.

8) स्त्रियांची स्थिती – मौर्यकाळामध्ये समाजातील स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळत असे आणि कुटुंबामध्येही स्त्रियांना सन्मानाने वागवले जात होते. कौटिल्याच्या मते, 'संकट प्रसंग सोडता स्त्री जर आपल्या पतीच्या परवानगी शिवाय बाहेर गेली तर तिला 6 पण दंड केला पाहिजे आणि

पतीच्या आज्ञेशिवाय पत्नी बाहेर गेली तर तिला १२ पण दंड केला पाहिजे " यावरून असा निष्कर्ष निघतो की मौर्य काळामध्ये जरी स्त्रियांना सन्मानाची वागणुक मिळत होती, परंतु स्वातंत्र्य नव्हते. तिच्यावर पतीची बंधने होती. "स्त्रिया फक्त पुत्रप्राप्तीच असतात ". असेही कौटिल्याने म्हटले आहे. राजकारणात स्त्रियांना सहभागी होता येत नसे. मौर्यकाळात स्त्रियांना पुर्नविवाहाचा व घटस्फोटाचा अधिकार होता.

एकंदरीत, वरील सर्व मुद्दयांच्या आधारे असे म्हणता येईल की, मौर्यकाळातील सामाजिक स्थिती ही आजच्या सामाजिक स्थितीपेक्षा संपूर्णतः वेगळी होती. संयुक्त कुटुंब पद्धत, मनोरंजनाची साधने, अन्न, पोशाख यांसारख्या बाबी वगळता मौर्यकालीन ज्या प्रथा होत्या. उदा: आश्रमव्यवस्था, पुर्नविवाह, हुंडा पद्धत, विवाहाच्या पद्धती या पुर्णपणे बदलल्या आहेत. काही प्रथा बंदही झाल्या आहेत. मौर्यकालीन सामाजिक परिस्थिती ही तत्कालीन काळातील काही प्रथा / बाबी वगळता मानवी समाजाला सुयोग्य होती असे म्हणता येईल.

कोल्हापूर

**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (EMPOWERED AUTONOMOUS)**

CONTINUOUS INTERNAL EXAMINATION

Subject – History

Class: B.A. I . Semester: II .

Paper Title: History of Ancient India .

Paper No: II .

Subject Code: 2 DSC01 HIS 21 .

| | |
|---|---|
| Date: | 13th Jan 2025 . |
| Total Marks: | 10. |
| Type of Test: | Open Book Test . |
| Module: | Mauryan Era . |

**Mark List of Students**

| Sr. No. | Roll No | Marks | Sr. No. | Roll No | Marks |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4082. | 10. | | | |
| 2 | 4148 | 10 | | | |
| 3 | 4156 | 07 | | | |
| 4 | 4311 | 06 | | | |
| 5 | 4107 | 07 | | | |
| 6 | 4089 | 06. | | | |
| 7 | 4290 | 05 | | | |
| 8 | 4218 | 07. | | | |
| 9 | 4293 | 07. | | | |
| 10 | | | | | |

Dr. S.R. Kattimani

HEAD
DEPARTMENT OF HISTORY
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)